I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 173 B.N.S.S)**

# प्रथम खबर अहवाल
**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S. (पोलीस ठाणे):** अर्जुनी मोरगांव **Year (वर्ष):** 2026

   **FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0167 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/03/2026 06:04 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

   1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 23/03/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 23/03/2026

   **Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 16:20 तास **Time To (वेळेपर्यंत):** 18:40 तास

   (b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 24/03/2026 **Time (वेळ):** 05:47 तास

   (c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 007 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 24/03/2026 05:47 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

      **(b) Address (पत्ता):** साई नगर ते आनंद डेरीच्या मागे ,अर्जुनी/मोर

      **(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

      **District (State) (जिल्हा (राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पो.नि.अरविंद पुंडलीक राऊत

(b) **Father's Name (चे नाव ):** पुंडलीक राऊत

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1989

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):**भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):** नोकरी

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ला प्र वी गोंदिया, गोंदिया, अर्जुनी मोरगांव, गोंदिया, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | ला प्र वी गोंदिया, गोंदिया, अर्जुनी मोरगांव, गोंदिया, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7507221155

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती गायत्री महादेव बोरकर | | पती चे नाव : महादेव बोरकर | 1. श्रीकांतभाउ नाकाडे यांचे घरी,Town/Village (शहर / गाव): आनंद डेअरीचे मागे,अर्जुनी/मोर,Tehsil (तहसील): अर्जुनी/मोर,Police Station (पोलीस ठाणे): अर्जुनी मोरगांव,District (जिल्हा): गोंदिया,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | एक रियलमी कंपनीचा सि 35 मॉडेल चा जुना वापरता मोबाईल | 3,000.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ध्वनी उपकरणे | 32 जी बी शमतेचे सँनाडिक्स कंपनीचे 3 मेमरी कार्ड | .00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 10 नोटा व 200 रु दराच्या 25 नोटा | 10,000.00 |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 13,000.00

**11.**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12.** **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद

दिनांकः- 24.03.2026

नांवः- अरविंद पुंडलिक राऊत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया
मो. क्र. 8275298475.

आज दिनांक 23/03/2026 रोजी आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय गोंदिया येथे कार्यालयीन कामे करीत असतांना पो.नि.उमाकांत उगले यांनी ला.प्र.वि.कार्यालयाचे दालनात बोलावुन सांगीतले की, कार्यालयाचे मोबाईल क्रमांक 9209041064 वर वेळ 11.00 वा. सुमारास मोबईल क्र. 8408024416 वरुन कॉल आल्याने तो कॉल रिसीव्ह केला असता कॉल करणारे इसमाने त्यांचे नाव श्री. शेषराम तुळषीराम पातोडे रा. अरततोंडी/दाभना ता. अर्जुनीमोरगाव असे सांगुन त्यांचा विटभट्टीचा व्यवसाय असुन तलाठी कार्यालय निमगाव येथील तलाठी श्रीमती गायत्री बोरकर यांनी दिनांक 12.3.2026 रोजी त्यांचे मोबाईलवर फोन करुन विटभट्टीकरीता अवैध माती उत्खन्नावर कारवाई न करण्यासाठी रु.37000/- द्यावे लागतील असे बोलल्याने त्यांनी त्यांचेकडे फक्त रु.10,000/- आहेत असे सांगीतल्यावर रु.10,000/- आता आणुन द्या व उर्वरीत 27,000/- नंतर द्या असे म्हटल्याने त्यांनी तलाठी कार्यालयात निमगाव येथे जावुन त्यांना रु.10,000/- दिले आहेत. त्यानंतर दिनांक 22.3.2026 रोजी तलाठी बोरकर मॅडम यांनी त्यांचे विटभट्यावर येवुन उर्वरीत रु.27,000/- मागीतले तेव्हा त्यांनी त्यांना पैसे नाहीत म्हणुन सांगीतले तेव्हा बोरकर मॅडम यांनी विटभटयावरील मातीकडे पाहुन 50 ब्रास माती आहे, रु.25,0000/- दंड भरावा लागेल कारवाई करायची नसेल तर राहीलेले 27,000/- उद्या आणुन द्या असे म्हणुन त्यांचेकडे रु.27,000/-रु. लाचेची मागणी करीत असल्याने त्यांच्याविरुध्द तक्रार करायची आहे, त्यांचे गांव नक्षल प्रभावित असुन, गोंदिया येथील कार्यालयापासुन 100 किमी. लांब अंतरावर असल्याने तिथपर्यंत येणे शक्य नाही आपण मोरगावअर्जुनी पर्यंत येऊ शकता काय? असे कळविल्याने, आम्ही त्यांना येऊ शकतो असे आष्वासीत करुन त्यांना गै.अ. मागत असलेले 27,000/- रु. सोबत घेवुन येण्यास सांगुन वेळ 15.00 वा. पर्यत नवेगावबांध ते अर्जुनीमोरगाव जाणा-या रोडवरील सुकळी फाटयाजवळ हजर राहण्यास सांगीतले तेव्हा त्यांनी त्यांचेकडे सध्या फक्त नगदी रु.10,000/- आहेत असे सांगीतल्याने त्यांना रु.10,000/- घेवुन हजर राहण्यास सांगीतले आहे असे सांगुन उर्वरीत रु.17,000/- लहान मुलांचे खेळण्यातील नोटा उपलब्ध करुन घेवुन तक्रारदार यांचे तक्रारीवर पुढील सापळा कार्यवाही करण्यास सांगीतले.

त्यावरुन लाच मागणीची पडताळणी करुन पुढील लाचेचा सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी नापोशि.अशोक कापसे यांच्या हस्ते वर्ग-3 चे े दोन कर्मचारी एक महिला व एक पुरुष पंच म्हणुन काम करण्यास उपलब्ध करून देण्याबाबत मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1 गोंदिया यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक 325/2026 दि. 23/03/2026 अन्वये दिले असता त्यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक 1519/2026 दि. 23/03/2026 अन्वये े श्री. राहुल अनंतराम गौतम व मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 2 गोंदिया यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक 323/2026 दि. 23/03/2026 अन्वये दिले असता त्यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक 888/2026 दि. 23/03/2026 अन्वये े श्रीमती गुनेश्वरी टिकेश्वर कटरे असे पंच म्हणुन उपलब्ध करुन दिल्याने दोन्ही पंच नापोषि. अषोक कापसे यांचेसह वेळ 12/30 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया कार्यालयात हजर आले. नापोशि. अशोक कापसे यांनी वरील नमुद दोन्ही पंचाची आमच्याशी ओळख करून दिली.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना सांगितले की, एका तक्रारदाराने एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधी कार्यालयीन मोबाईल फोनवर तक्रार सांगीतली असुन, आपणास आमचे सोबत यायचे आहे, तक्रारदार हे नवेगावबांध ते अर्जुनीमोरगाव रोडवरील सुकळी फाटयाजवळ भेटणार आहेत, तेव्हा त्यांची तक्रार ऐकुन घेवुन तक्रारीनुसार नमूद लोकसेवकाने तक्रारदाराकडे लाचेची मागणी केल्यास व लाच मागणीबाबत योग्य पडताळणी झाल्यास त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजित करून पुढील कायदेशीर कारवाई करावयाची आहे असे सांगुन सदर लाच सापळा कारवाईत पंच म्हणुन काम करण्याची त्यांची संमती विचारली असता त्यांनी पंच म्हणुन काम करण्याची संमती दिली. त्यावरुन श्री. राहुल अनंतराम गौतम यांना पंच क्र. 1 तर श्रीमती गुनेश्वरी टिकेश्वर कटरे यांना पंच क्र. 2 म्हणुन नेमण्याचे ठरविण्यात आले.

सापळा पार्टीतील सदस्य पो.नि. उमाकांत उगले, स.फौ. चंद्रकांत करपे, पो.हवा. संजयकुमार बोहरे, मंगेश काहालकर, नापोशि. संतोष शेंडे, संतोष बोपचे, प्रशांत सोनवाने, मनापोशि संगीता पटले, चानापोशि दिपक बाटबर्वे सर्व ला.प्र.वि. कार्यालय गोंदिया यांचा नमुद दोन्ही पंचांशी परिचय करून दिला.

त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पो. हवा मंगेश काहालकर यांनी सापळा कार्यवाही साठी लागणारे सर्व साहीत्याचे ट्रॅप सुटकेस, लॅपटाॅप, प्रिंटर जोडणी उपकरणासह तसेच उपलब्ध करुन घेतलेले भारतीय बच्चो का बँकचे रु.500/- दराचे 34 खेळणी नोटा व दरी असे संपुर्ण साहित्य शासकीय वाहन क्र. एम.एच.35/एडब्ल्यु 0486 मध्ये ठेवले.

त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पार्टीतील सदस्य पो.हवा. मंगेष काहालकर, ना.पो.षि. संतोष बोपचे, नापोशि. प्रशांत सोनवाने व चा.ना.पो.शि. दिपक बाटबर्वे असे शासकिय वाहनाने आणि पो.नि. उमाकांत उगले, स.फौ. चंद्रकांत करपे, पो.हवा.संजयकुमार बोहरे, ना.पो.षि संतोष शेंडे व मनापोशि संगीता पटले असे खाजगी चारचाकी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथुन नवेगावबांध ते अर्जुनीमोरगाव रोडवरील सुकळी फाटा येथे जाण्याकरीता 13.00 वा. रवाना होवुन 15.00 वा. सुमारास सुकळी फाटयाजवळ पोहचलो असता, आम्ही सांगीतल्या प्रमाणे फाटयाजवळ रोडच्या बाजुला एक ईसम मोटारसायकलसह थांबुन दिसले. परंतु आम्ही त्यांना व ते आम्हास

ओळखत नसल्याने थांबुन असलेले ईसम हे तक्रारदार आहेत किंवा कसे? याबाबत खात्री करण्याकरीता, आम्ही स्वतः उभे असलेल्या इसमाजवळ जावुन त्यांना त्यांचे नाव विचाले असता त्यांनी आपले नाव शेषराम पातोडे रा.अरततोंडी असे सांगीतल्याने तेच तक्रारदार असल्याची खात्री झाल्याने आम्ही आमचा परिचय दिला. त्यानंतर आम्ही सर्वांनी आपआपले वाहन कोणाचेही नजरेस पडणार नाहीत अषाप्रकारे रोडच्या बाजुला असलेल्या झुडपी जंगलामध्ये ठेवुन व त्याच ठिकाणी बसुन पुढील कार्यवाही विषयी सर्वांना समजावुन सांगीतले.

त्यानंतर तक्रारदारास आम्ही उपस्थित दोन्ही पंच व सापळा पथकाशी परिचय करुन दिला. त्यांनतर तक्रारदार यांना दोन्ही पंचासमक्ष त्यांच्या तक्रारीबाबत विचारपुस केली व त्यांना त्यांची तक्रार लिहुन देण्यास सांगीतले असता, त्यांनी त्यांची तक्रार लिहुन आणली असल्याचे सांगुन आम्हास दिली. आम्ही ती तक्रार वाचुन दोन्ही पंचास वाचण्यास दिली, दोन्ही पंचानी वाचुन व तक्रारदार यांनी आम्हा व दोन्ही पंचासमक्ष कथन केलेली तक्रार बरोबर असल्याची खात्री झाल्याने त्या तक्रारीवर दोन्ही पंचानी तारखेनीषी स्वाक्षरी केली, त्यांनतर आम्ही त्यावर स्वाक्षरी केली. तक्रारदार यांनी लिहुन आणलेली तक्रार खालील प्रमाणे.

तक्रार

दिनांक-23/03/2026

प्रति,
मा. पोलीस उपअधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया.

विषयः- श्रीमती गायत्री बोरकर, तलाठी कार्यालय निमगांव यांच्याविरुध्द लाच मागणी संबधी कायदेशीर कारवाई करण्याबाबत.

अर्जदारः- श्री. शेषराम तुळशिराम पातोडे, वय- 42 वर्ष, व्यवसाय- विट भट्टी, रा. अरततोंडी/दाभना, ता. अर्जुनी मोरगांव, जि. गोंदिया. मो.क्र. 8408024416

महोदय,

सविनय सादर आहे की, वर नमुद पत्यावर कुटूंबासह राहत असुन विट भट्टीचा व्यवसाय करुन आपल्या कुटूंबाची उपजिवीका भागवतो. विट भट्यासाठी लागणारी माती गावातील शेतक-याकडुन आणत असतो, मागील वर्षी-2025 मध्ये मार्च महिण्यामध्ये तारीख निश्चित आठवत नाही निमगांव येथील तलाठी श्रीमती गायत्री बोरकर हया विट भट्टीवर आल्या व मला म्हणाल्या की, तुम्ही विट भट्टीसाठी अवैद्य उत्खनन करुन माती वापरता तुमच्यावर कारवाई न-करण्यासाठी मला 33,000/- रुपये दयावे लागतील. असे म्हणुन माझ्या कडुन 33,000/- रुपये घेवुन निघुन गेल्या, त्यावर मला कोणतीही पावती दिली नाही. त्यानंतर यावर्षी दिनांक 12/03/2026 रोजी श्रीमती गायत्री बोरकर मॅडम यांनी माझ्या मोबाईलवर फोन करुन म्हणाल्या की, तुमच्यावर कायदेषीर कारवाई न-करण्यासाठी याही वर्षी रुपये 37,000/- दयावे लागतील तेंव्हा मी त्यांना माझ्याकडे फक्त 10,000/- रुपये आहेत असे म्हणालो तेव्हा त्यांनी 10,000/- रुपये आता आनुन दया व उर्वरीत 27,000/- रुपये नंतर आणुन

दया असे म्हणाले असता, मी 10,000/- रुपये तलाठी कार्यालय निमगांव येथे जाऊन श्रीमती बोरकर मॅडम यांना दिले आहे. त्यानंतर दिनांक 22/03/2026 रोजी माझ्या विट भट्यावर येऊन उर्वरीत 27,000/- रुपये दया असे म्हणाले असता माझ्याकडे पैसे नसल्याबाबत सांगीतले, तेव्हा त्यांनी विट भट्टीवर असलेल्या मातीकडे पाहुन हि माती 50 ब्रास आहे, म्हणुन 2,50,000/- रुपये दंड भरावा लागेल, कारवाई नसेल करायची तर राहिलेले 27,000/- रुपये उद्या आनुन दया, असे म्हणुन विट भट्टीवर काम करीत असलेल्या गोपाल मुनेश्वर यांचे नाव कागदावर लिहुन त्यावर त्यांची स्वाक्षरी घेतली. मला सही करण्यासाठी सांगीतले असता, मी सही न करता पैसे आनुन देतो असे म्हणालो असता त्या निघुन गेल्या.

श्रीमती गायत्री बोरकर मॅडम, तलाठी निमगांव यांनी गेल्यावर्षी माझ्याकडुन घेतलेले 33,000/- रुपये, या वर्षी घेतलेले 10,000/- रुपये व राहिलेले 27,000/- रुपये मागत असलेले कायदेशीर फिस नसुन लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली आहे. तरी मला लाच मागणारी श्रीमती गायत्री बोरकर मॅडम, तलाठी निमगांव यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची विंनती आहे.

श्रीमती बोरकर मॅडम यांच्याबरोबर माझे कोणतेही आर्थीक देवान-घेवान नाही, तसेच वैमनस्य नाही.त्यानंतर तक्रारदार यांना गै.अ. यांना लाचेमध्ये देण्याकरीता 10,000/- रु. आणले का असे विचारले असता त्यांनी सोबत आणले असल्याचे सांगीतले. त्यावरुन त्यांनी स्वतःच्या बचतीतुन त्यांच्याकडे जमा असलेल्या 500/- रू. दराचे 10 चलनी नोटा व 200/- रु. दराचे 25 चलनी नोटा असे एकुण 10,000/- रू. आमचेकडे जमा केले. त्या नोटांचे क्रमांक आमचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी वाचले व पंच क्र. 2 यांनी पडताळुन पाहिले. सदर नोटांची वेगळी यादी तयार करण्यात आली आहे. व उर्वरीत भारतीय बच्चो का बॅंकचे रु.500/- दराचे 34 खेळणी नोटा उपलब्ध करुन घेतल्या. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार यांना लाचेच्या सापळा कार्यवाही करीता उपयोगात येणा-या अँथ्राॅसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग व त्यांचे वैशीष्टे समजावून सांगुण अधिनस्त अंमलदार यांचे करवी प्रात्यक्षिक करुन दाखविला.

तक्रारदार यांनी दिलेल्या लेखी तक्रारी नुसार गै.अ. श्रीमती गायत्री बोरकर, तलाठी निमगाव यांची तक्रारदाराकडे खरोखरच लाचेची मागणी आहे काय? याबाबत पंचाचे उपस्थितीत कार्यालयीन व्हाॅईस रेकार्डरद्वारे लाच मागणीची पडताळणी करुन लाच मागणीची योग्य पडताळणी झाल्यास पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली किंवा कसे? याबाबत तक्रारदार व पंच क्र 1 यांना गैरअर्जदार यांचेकडे पाठवुन तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यात होणारे संभाषण व्हाईस रेकाॅर्डरद्वारे मेमरी कार्ड मध्ये रेकाॅर्ड करणे असल्याने आमचे सुचनेवरुन पो.ना. संतोष बोपचे यांनी तक्रारदार तसेच दोन्ही पंचांना कार्यालयीन ”सोनी“ कंपनीचे ICD-PX470 डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर तसेच सॅनडिस्क कंपनीचे नविन मेमरी कार्ड काढुन दाखविले. व्हाईस रेकार्डर मध्ये नविन सेल टाकुन व्हाईस रेकार्डर सुरु करुन त्यात कोणत्याही प्रकारची व्हाईस रेकाॅर्ड फाईल नसल्याची पंच व तक्रारदार यांना खात्री करुन दिली. त्यानंतर प्लाॅस्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 3484DVFE70UT असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन सदर डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये

कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत दोन्ही पंचानी व आम्ही खात्री केली. सदर डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व गैरअर्जदार यांचे आवाज कशा पध्द्तीने रेकार्ड करण्यात येते, व्हाईस रेकार्डर कशा पध्दतीने बंद करण्यात येतो याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचाना समजावुन सांगण्यात आले. त्यानंतर व्हाईस रेकार्डरच्या सहाय्याने मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डर फाॅर्मेट करुन पंचानी मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरीकार्ड मध्ये कोणत्याही प्रकारची रेकाॅर्ड फाईल नसल्याची खात्री केली.

सदर कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांनी गै.अ. श्रीमती गायत्री बोरकर यांचा त्यांचे मोबाईलवर काॅल येत असल्याचे सांगीतल्याने त्यांना मोबाईलचे स्पिकर सुरु करुन बोलणी करण्यास सांगीतले तेव्हा गै.अ.यांनी तक्रारदार यांना साईनगर अर्जुनीमोरगाव येथे येण्यास सांगुन तिथे आल्यावर मोबाईलवर संपर्क करण्याचे सांगीतले. त्यावरुन गै.अ. श्रीमती गायत्री बोरकर तलाठी निमगाव यांचे विरुध्दची लाच माणगी पडताळणी कार्यवाही आजच त्यांनी बोलविलेल्या ठिकाणी जावुन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा कार्यवाहीतील सदस्याना लाच मागणी पडताळणी वेळी घेण्यात येणा-या दक्षतेबाबत सुचना समजावुन सांगीतल्या. त्यानंतर पंच क्रमांक 1 यांना तक्रारदार यांची अंगझडती घेण्यास सांगीतले त्यावरुन पंच क्र. 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन पो.ना. संतोष बोपचे यांनी सुस्थितीत करुन ठेवलेले सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हाॅईस रेकार्डर वेळ 16.20 वाजता सुरु करुन पंच क्र. 1 व तक्रारदार यांचे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हाॅईस रेकाॅर्डर कापडी पिशवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन दिले.

त्यानंतर तक्रारदार यांना त्यांचे मोटारसायकलने पंच क्र. 1 यांचेसह आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणाहुन साईनगर अर्जुनीमोरगाव येथे लाच मागणी संबधाने बोलणी करण्याकरीता पाठविण्यात आले. आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्य त्याच ठिकाणी थांबुन राहीलो.

तक्रारदार हे गै.अ. यांचेशी बोलणी करून पंच क्र. 1 यांचेसह आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणी परत आले. आमचे सुचनेवरुन पो.ना. संतोष बोपचे यांनी तक्रारदार यांचे गळयात असलेले व्हाॅईस रेकाॅर्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 17.00 वाजता बंद केले. व्हाॅईस रेकाॅर्डरच्या मेमोरी कार्ड मधील PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260323_1620.mp3 रेकाॅर्ड झाल्याचे दिसुन आले.

त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना घडलेली हकीकत कथन करण्यास सांगीतले असता पंच क्र. 1 यांनी सांगीतले की, ”मी तक्रारदार यांचे सोबत त्यांचे मोटार सायकलने गै.अ. यांना भेटण्याकरीता गै.अ. यांचे सांगणेप्रमाणे साईनगर अर्जुनीमोरगांव येथे पोहचल्यावर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलचे स्पिकर सुरु करुन गै.अ. यांचे मोबाईलवर फोन लावुन बोरकर मॅडम कुठे आहात असे विचारल्यावर मस्जिदच्या गल्लीजवळ रोडवर उभी असल्याचे सांगुन तिकडे येण्यास सांगीतले. त्यावरुन मी तक्रारदार यांचेसह मोटार सायकलने मस्जिद जवळील मिरा नगरीचे गेटजवळ

पोहचल्यावर तक्रारदार यांनी गै.अ. यांना पुन्हा फोन लावुन विचारल्यावर त्यानी मस्जिदच्या रोडना सरळ या, मी उभी आहो तिथे असे सांगीतले तेव्हा आम्ही मस्जिदच्या रोडनी गेलो असता रोडवर एक महीला उभी दिसली तिला पाहुन तक्रारदर यांनी मोटार सायकल थांबवुन नमस्कार मॅडम असे म्हटले त्यावरुन ती महीला गै.अ. बोरकर असल्याची माझी खात्री झाली. त्यानंतर त्यांच्यात चालान संबंधाने बोलणी होवुन तक्रारदार यांनी त्यांना तेत्तीस हजार तुमाले मागे देलो जी, या वर्षी पाच हजार वरचे वाढवले असे म्हटले त्यावर गै.अ. यांनी नाही सदतीस हजार आहे असे म्हटले तेव्हा तक्रारदार यांनी मागच्या वर्षी तेत्तीस होते ना असे म्हटल्यावर गै.अ. यांनी मागच्या वर्षीचे तुम्ही नाही घेवुन फिरु सका, प्रत्येक वर्षीचा सिस्टम वेगवेगळा आहे असे म्हटले.त्यावर तक्रारदार यांनी तो जावु दया आता फक्त मले रात्रीची रियात दया आता तुम्हाले दहा हजार रुपये आणुन देतो आणि उदया सकाळी सात वाजे तुमच्या घरी येतो, आता नाही नको म्हणा असे म्हटल्यावर गै.अ. यांनी उर्वरीत उदया पुर्ण करुन दयाल असे म्हटले. तेव्हा तक्रारदार यांनी त्याना उर्वरीत किती असे विचारलेवर गै.अ. यांनी सतरा राहतील असे सांगीतले तसेच दोन कमी करीन, पस्तीस वगैरे कर जा जावु दया दोन हजार असे म्हणाल्या. तेव्हा तक्रारदार यांनी थोडया वेळाने मी घरुन येतो कोठे भेटु असे विचारल्यावर गै.अ. यांनी आता घरी भेटीन ठिक आहे. असे म्हटल्याने मी तक्रारदार यांचे सोबत सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो असे पंच क्र. 1 यांनी सांगितलेल्या हकीकतीस तक्रारदार यांनीही दुजोरा दिला.

त्यानंतर आम्ही लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकार्डरच्या मेमरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये 260323_1620.mp3 मध्ये तक्रारदार व गै.अ. यांच्यातील रेकॉर्ड झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले व दोन्ही पंचांना ऐकविले. पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकीकत व त्यास तक्रारदार यांनी दिलेल्या दुजो-यावरुन तसेच तक्रारदार व गै.अ यांच्यात झालेल्या संभाषणावरुन गै.अ. यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती 35,000/- रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी दिनांक 12/03/2026 रोजी 10000 रु. स्विकारल्याचे मान्या करुन आता 10,000/-रुपये व उर्वरीत 15,000/- रुपये उदया सकाळी 9.00 वा. अगोदर आणुन दयाल असे म्हणुन आज रोजी 10,000/-रुपये लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवल्याचे आमची व दोन्ही पंचाची खात्री झाली. त्यावरुन गै.अ. यांचेविरुध्दची सापळा कार्यवाही आजच त्यांचे राहते घरी आनंद डेअरीच्या मागे अर्जुनी मोरगांव येथे करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा कार्यवाहीतील सदस्याना लाच मागणी पडताळणी वेळी घेण्यात येणा-या दक्षतेबाबत सुचना समजावुन सांगीतल्या. त्यानंतर पंच क्रमांक 1 यांना तक्रारदार यांची अंगझडती घेण्यास सांगीतले त्यावरुन पंच क्र. 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली.

त्यानंतर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान गै.अ. यांनी तक्रारदार यांचेकडे आता रु.10,000/- माझे घरी आणुन द्या व उर्वरीत रु.15000/- उद्या सकाळी 09.00 वा.चे पहीले आणुन द्या असे म्हणुन तक्रारदार यांचे विटभट्टी करीता अवैध उत्खनन केलेल्या मातीवर कारवाई न करण्याकरीता तडजोडीअंती रु.35000/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन आता रु.10000/- लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याने आमचे सुचनेवरुन पो.हवा.संतोष शेंडे यांनी ट्रॅप सुटकेस मधुन लाच रकमेचा लिफाफा बाहेर काढुन पंच क्र.2 यांचेकडे दिला. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच क्र.1 यांनी सदर लिफाफ्यामधुन अँथ्रासीन पावडर लावलेल्या रू. 500/- दराचे 10

चलनी नोटा व रु.200/- दराचे 25 चलनी नोटा असे एकुण रू. 10000/- बाहेर काढुन तक्रारदार यांच्या फुलपँटच्या उजव्या खिशामध्ये अलगद ठेवुन दिल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्याचप्रमाणे नापोषि प्रशांत सोनवाने यांना दोन्ही पंच व तक्रारदार यांचे समक्ष सुचना दिल्या की गै.अ. यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार हे गै.अ. यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित ईशारा करतील त्यावेळेस तसेच आरोपी कडुन जप्त करण्यात येणा-या कार्यवाहीवेळी आपण कार्यालयीन मोबाईलमध्ये सदरचे चित्रीकरण करावे अशा सुचना देवुन कार्यालयीन REALME मोबाईलमध्ये 32 क्षमतेचे सॅनडिस्क कंपनीचे ज्याचा सिरीयल क्र. 3485DVFND0SF असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन मोबाईलमधील मेमरी कार्ड स्लाॅट मध्ये ईन्सल्ट केले. त्यानतर मोबाईल सेटींग मध्ये जावुन सदरचे मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचा कोणताही डेटा जतन नसल्याची आम्ही पंचाना खात्री करून दिली. त्यानंतर मोबाईल मधील सेटींगमध्ये जावुन फोटो व व्हिडीओ चित्रीकरण हे डायरेक्ट मोबाईलमधील मेमरी कार्डमध्ये जतन होणार असल्याचे सुनिश्चित करण्यात आले.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन नापोषि संतोष बोपचे यांनी सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर मधुन लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान वापरण्यात आलेले मेमंरी कार्ड बाहेर काढुन त्यांचे मुळ आवरणाममध्ये ठेवुन ट्रॅप सुटकेस मध्ये सुरक्षीत ठेवुन दिले. त्यानंतर प्लाॅस्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 3484DVFE70V1 असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन सदर डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर तक्रारदार व दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत खात्री केली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन नापोषि संतोष बोपचे यांनी वेळ 17.56 वा. व्हाईस रेकार्ड सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे आवाजात लाच रक्कम देण्याकरीता गै.अ. यांचेकडे जात असल्याचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हाॅईस रेकाॅर्डर कापडी पिशवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयात दोरीचे सहायाने शर्टचे आत लटकवुन तक्रारदार व पंच क्र. 1 यांना आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणाहुन तक्रारदार यांचे खाजगी मोटारसायकलने गै.अ. यांना लाच रक्कम देण्याकरीता गै.अ.यांचे राहते घरी अर्जुनीमोरगाव येथे जाणेस रवाना केले. त्यानंतर आम्ही, पंच क्र. 2, पो.हवा.मंगेष काहालकर, नापोशि संतोष बोपचे, मनापोशि.संगीता पटले े व चानापोशि.दिपक बाटबर्वे हे शासकीय वाहन क्र. एम.एच.35/अेडब्लु-0486 ने तर पोनि उमाकांत उगले, स.फौ.चंद्रकांत करपे, पो.हवा.संजयकुमार बोहरे, नापोषि.संतोष शेंडे, प्रशांत सोनवाने हे खाजगी चारचाकी वाहनाने अर्जुनीमोरगाव येथे जाण्यास रवाना झालो. आम्ही सर्व आनंद डेअरीच्या मागे पोहचुन आप-आपले वाहन कोणालाही संशय येणार नाही अशा स्थितीत उभे करुन व तिथेच थांबुन तक्रारदार यांचे नियोजीत ईषा-याची वाट पाहत बसलो. तक्रारदार हे पंच क्र.1 सह गै.अ.यांचे घरासमोर त्यांची वाट पाहत गेटजवळ उभे होते. थोडया वेळाने एक महिला आपले लाल रंगाचे स्कुटीने रोडनी येवुन तक्रारदाराजवळ थांबुन त्यांचेशी बोलतांना दिसली व त्यानंतर तक्रारदार यांनी आपल्या फुलपँटचे उजवे खिशातुन लाच रक्कम काढुन गै.अ.यांना दिली व गै.अ.यांनी ती लाच रक्कम उजवे हातानी स्विकारुन डाव्या हातात ठेवली असल्याचे दिसुन आले. त्यानंतर तक्रारदार

यांनी त्यांचे गळयातील दुपट्टा काढुन आपले हातात ठेवुन गै.अ. यांनी त्यांचेकडुन लाचेची रक्कम स्वीकारल्याचा नियोजित ईशारा केला. तक्रारदाराने केलेला नियोजित ईशारा तसेच प्रत्यक्ष घटना पाहुन आम्ही, सापळा पार्टीतील सर्व सदस्य पंच क्र. 2 यांचेसह तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे जवळ पोहचुन गै.अ. यांना मनापोशि.संगीता पटले यांचे हस्ते पकडुन त्यांना आपला परिचय देवुन सहकार्य करण्यास सांगीतले असता त्या तिथेच शांतपणे उभे राहील्या. तक्रारदार यांना त्या ठिकाणाहुन थोडया अंतरावर जावुन थांबण्यास सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना जवळ बोलावुन आमच्या सुचनेवरुन नापोशि संतोष बोपचे यांनी तक्रारदार यांचे गळयात लटकवुन असलेले व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्यामध्ये पंच क्र. 1 यांचे आवाजात सापळा कार्यवाही पुर्ण झाल्याबाबत वक्तव्य ध्वनीमुद्रीत करुन व्हाईस रेकॉर्डर 18.40 वाजता बंद केले. व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमोरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260323_1756.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसुन आले.

त्यानंतर आम्ही लाच रक्कम स्विकारणा-या महिलेस त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी आपले नाव श्रीमती गायत्री महादेव बोरकर वय 41 वर्ष, पद ग्राम महसुल अधिकारी साजा निमगाव क्र.10 ता.अर्जुनीमोरगाव जि.गोंदिया, रा.श्री श्रीकांतभाउ नाकाडे यांचे घरी किरायाने, आनंद डेअरीचे मागे, अर्जुनीमोरगाव असे सांगीतले.  त्यानंतर आमचे सुचनेवरून अधिनस्त अंमलदार यांनी शासकीय वाहनात ठेवलेली ट्रॅप सुटकेस व साहीत्य आणले. त्यानंतर आम्ही पोहवा मंगेश काहालकर यांना आम्हा सर्वांचे हात अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रकाषात तपासण्यास सांगितले. त्यांनी काळया कापडाचे सहाय्याने प्रकाशाची तीव्रता कमी केली. त्यानंतर अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रकाशात सर्वप्रथम आम्ही, पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांचे हात तपासले असता कोणाचेही हातास कोणत्याच प्रकारची चकाकी दिसून येत नसल्याची गै.अ.यांना खात्री करुन दिली. त्यानंतर काळा कापड हटवुन प्रकाश पुर्ववत करण्यात आला.  त्यानंतर पुन्हा काळया कापडाचे सहाय्याने प्रकाशाची तिव्रता कमी केली व गै.अ. गायत्री बोरकर यांचे दोन्ही हात अल्ट्राव्हॉयलेट लॅम्पचे प्रकाशात तपासले असता त्यांचे दोन्ही हाताचे बोटांवर, अँथ्रॉसीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली त्यानंतर काळा कापड हटवुन प्रकाश पुर्ववत करण्यात आला.  त्यानंतर आरोपी गायत्री बोरकर यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम उजव्या हातानी स्विकारुन आपले डाव्या हातात ठेवली असल्याने आमचे सुचनेवरुन पंच क्र. 2 यांनी सदर लाच रक्कम रु.500 दराचे 10 चलनी नोटा व रु.200 दराचे 25 चलनी नोटा असे एकुण रू. 10,000/- आरोपीचे हातातुन घेवुन आपल्या हातात ठेवल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरुन ना.पो.शि.संतोष शेंडे यांनी खाली जमीनीवर दरी अंथरल्यावर पंच क्र.2 यांना त्यावर त्या नोटा पसरवुन ठेवण्यास सांगितले. त्यानुसार पंच क्र. 2 यांनी त्यावर त्या नोटा पसरवुन ठेवल्या. त्यानंतर आमचे सुचने वरुन अधिनस्त अमलदार यांनी काळया कपडयाचे सहाय्याने प्रकाशाची तिव्रता कमी करून लाच रकमेच्या नोटांना अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रकाशात तपासले असता सदर नोटांना दोन्ही बाजुने अँथ्रॉसीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आल्याने सदर रक्कम ही लाचेची रक्कम असल्याची आमची व पंचाची खात्री झाली. त्यानंतर कापड हटवुन प्रकाश पुर्ववत करुन लाचेच्या नोटांचे क्रमांक पंच क्रमांक 2 यांना वाचण्यास सांगितले असता त्यांनी वाचून दाखविलेले नोटांचे क्रमांक खालील प्रमाणे आहेत. आमचे सुचनेवरुन याबाबत नापोशि प्रशांत सोनवाने

यांनी कार्यालयीन मोबाईलमध्ये चित्रीकरण केले.

त्यानंतर सदर नोटांचे क्रमांक पंच क्र. 2 यांनी वाचुन दाखविले व पंच क्र. 1 यांनी ते तक्रारदार यांनी लाच रक्कम जमा करतेवेळी तयार केलेल्या लाच रकमेच्या नोंटांच्या यादीतील क्रमांकाषी जुळवुन पाहीले असता सापळा कार्यवाही करीता जातांना रु.500/- दराचे 10 चलनी नोट व रु.200/- दराचे 25 चलनी नोटांचे क्रमांक गै.अ. यांनी स्विकारलेल्या नोटांचे क्रमांकाषी तंतोतंत जुळुन आले. त्या नोटा एका हिरव्या रंगाच्या कागदी लिफाफ्यामध्ये ठेवुन त्या लिफाफ्यावर जप्त मुद्येमालाचेे वर्णनाचे टंकलिखीत केलेला कागद चिटकवुन सदर लिफाफ्यावर आमचे, दोन्ही पंचांचे व ज्याचे पासुन जप्त केले ते आरोपी श्रीमती गायत्री महादेव बोरकर यांची सही घेवुन तो लिफाफा कार्यालयीन सिलने सिलबंद केला. तसेच गै.अ. यांचेकडे असलेला realme कंपनीचा C35 मॉडेल असलेला मोबाईल एका हिरव्या रंगाच्या कागदी लिफाफ्यामध्ये ठेवुन त्या लिफाफ्यावर जप्त मुद्येमालाचेे वर्णनाचे टंकलिखीत केलेला कागद चिटकवुन सदर लिफाफ्यावर आमचे, दोन्ही पंचांचे व ज्याचे पासुन जप्त केले ते आरोपी गायत्री महादेव बोरकर यांची सही घेवुन तो लिफाफा कार्यालयीन सिलने सिलबंद करुन तपासकामी जप्तीपत्रक क्र. 1 अन्वये जप्त करण्यात आला.

त्यानंतर आमचे सुचनेवरून महिला पंच क्र 2 यांनी महिला अमलदार यांचेसह आलोसे गायत्री बोरकर यांना घराचे गेटचे आत आडोषाला नेवुन पोर्चमध्ये त्यांची अंगझडती घेतली. अंगझडतीमध्ये मिळुन आलेले साहीत्य व त्यांच्या पेहरावाबाबत वेगळी विस्तृत अंगझडती यादी तयार करण्यात आली. त्या यादीवर दोन्ही पंच व आम्ही सहया केल्या आहेत. आरोपी यांची अंगझडती यादी मधील साहीत्य परत मिळाल्याबाबत त्यांची सही घेण्यात आली. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना ते तक्रारदारासह सुकळी फाटा झुडपी जंगल ते आरोपीचे राहते घर येथे पोहचुन नियोजित इशारा करेपर्यत घडलेल्या घटना व झालेले संभाषण याबाबत सविस्तर माहिती सर्वासमक्ष पंच क्र. 2 यांना सांगण्याबाबत निर्देष दिले. त्यावरून पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकीकत पुढील प्रमाणे आहे. ”मी तक्रारदार यांचेसोबत त्यांचे मोटारसायकलने सुकळी फाटा येथुन गै.अ. यांचे राहते घर सिव्हील लाईन आनंद डेअरीच्या मागे, अर्जुनी मोरगांव येथे गेल्यावर तक्रारदार यांनी गै.अ. यांना फोन लावुन मी रुमवर आलो आहो असे सांगीतले त्यावर गै.अ. यांनी हो एक मिनट असे म्हणुन थोडयाच वेळात त्यांचे स्कुटी गाडीने आल्या. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांना घ्या मागच्या वर्षीचे चालान नाही दिल्या, चालान कमी नाही केल्या, ना याही वर्षीचा विषय नाही केल्या असे म्हणुन आपल्या उजव्या खिषातुन रुपये 10,000/- लाच रक्कम काढुन गै.अ.यांना दिल्यावर त्यांनी ती लाच रक्कम आपले उजव्या हातानी स्विकारुन आपले डाव्या हातात ठेवले व तक्रारदार यांना तुम्हाले युपीआयने पाच मिनटात भरुन देतो मी, असे म्हटले तेव्हा तक्रारदार यांनी मागच्या वर्षी चालान घेतलो नाही असे म्हटले त्यावर गै.अ. यांनी तुम्हाला घेण्याचा विषयच नाही राहीला आहे सिधा युपीआय नाही तर सिधा एसबिआय बॅकेत भरना होते, तो विषय राहीला नाही असे म्हटल्यावर तक्रारदार यांनी त्यांना पण थोडा कमी बहुत केल्या असता जी असे म्हटल्यावर गै.अ. यांनी नाही भाऊ साहेब नाही मानत असे म्हटले तेव्हा तक्रारदार यांनी चला मंग येतो मी असे म्हणुन त्यांनी सापळा पथकास गै.अ. यांनी लाच रक्कम स्वीकारल्याचा नियोजीत इषारा केला. त्यानंतर आपण पंच क्र. 2 तसेच सापळा पार्टीतील सर्व सदस्यासह येऊन पुढील कार्यवाही केली“ अशी घटनेची हकीकत

पंच क्र. 1 यांनी पंच क्र. 2 यांना सर्वासमक्ष सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पंच क्र. 1 यांनी कथन केलेल्या हकीकत बाबत विचारणा केली असता त्यांनी पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकिकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामामध्ये घेण्यात आले आहेत.

तरी दिनांक 23.03.2026 रोजी तक्रारदार श्री शेषराम तुळषिराम पातोडे,यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 23.03.2026 चे 16.20 वा ते 18.40 वा साई नगर अर्जुनीमोरगाव ते आरोपीचे राहाते घर आनंद डेअरीचे मागे अर्जुनीमोरगाव ता. अुर्जनीमोरगाव जि. गोंदिया येथे पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही व सापळा कारवाई दरम्यान श्रीमती गायत्री महादेव बोरकर वय 41 वर्ष, पद ग्राम महसुल अधिकारी साजा निमगाव क्र.10 ता.अर्जुनीमोरगाव जि.गोंदिया, रा. श्रीकांतभाउ नाकाडे यांचे घरी किरायाने, आनंद डेअरीचे मागे, अर्जुनीमोरगाव यांनी तक्रारदार यांचे विटभट्टी करीता अवैध उत्खनन केलेल्या मातीवर कारवाई न करण्याकरीता तडजोडीअंती रु.35000/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन दिनांक 12.03.2026 रोजी रु. 10000/- स्विकारल्याचे मान्य करुन आता रु. 10,000/- व उर्वरीत रु. 15,000/- दिनांक 24.03.2026 रोजी स्विकारण्याची तयारी दर्षवुन सापळा कार्यवाही दरम्यान रु. 10,000/- पंचासमक्ष स्विकारुन गैरफायदा घेतला आहे. म्हणुन माझी आरोपी लोकसेवीका श्रीमती गायत्री महादेव बोरकर वय 41 वर्ष, पद ग्राम महसुल अधिकारी साजा निमगाव क्र.10 ता.अर्जुनीमोरगाव जि.गोंदिया, रा.श्री श्रीकांतभाउ नाकाडे यांचे घरी किरायाने, आनंद डेअरीचे मागे, अर्जुनीमोरगाव विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम 1988 (सुधारीत अधिनीयम 2018 ) चे कलम 7 प्रमाणे गुन्हा नोंद होणेकरीता कायदेशिर फिर्याद देत आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** kamlesh vilas sontakke (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** kamlesh vilas sontakke

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** 1983

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | 1985 | | - | | **चेचक:** क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**